International Innovative Journal Impact Factor (IIJIF) Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VI Issue – IV November - December 2017

# औरंगाबाद शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसायिक मूल्यांचा अभ्यास.

**डॉ. वडमारे धनंजय सूर्यकांत**
**प्राचार्य**
**डॉ. डी. एस.आहेर, शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**लोहणेर, ता. देवळा, जि.नाशिक**

**शिक्षण प्रक्रियेत शिक्षक विद्यार्थी व सामाजिक नैसर्गिक वातावरण या तीन घटकांनी शिक्षण प्रक्रिया पूर्ण होते.त्यामुळे शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील किती महत्वाचा घटक आहे हे आपल्या लक्षात येईल .पुरातन काळापासून शिक्षकाकडून आदर्श वर्तनाची अपेक्षा समाजाला आहे. एक सामान्य शिक्षक संपूर्ण अनिष्ठ अन्यायी राज्यव्यवस्था उलथून लावू शकतो.हे कौटिल्य सारख्या शिक्षकाने जगाला दाखवून दिले आहे.शिक्षकी हा व्यवसाय असला तरी तो एक धर्म आहे.प्राचीन काळापासून शिक्षकी व्यवसायाला समाजात श्रेष्ठ स्थान आहे.त्याचे प्रमुख कारण म्हणजे या व्यवसायाची प्रतिष्ठा आहे.हि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी शिक्षकांमध्ये व्यावसायिक मूल्य विकसित होणे क्रमप्राप्त आहे.**

**प्रस्तावना-**

एखाद्या व्यवसायात यश मिळवायचे असेल तर व्यवसायाची सुरवात करतांना ती मूल्यावर अधारित करणे गरजेचे आहे.मूल्य समुह जर व्यक्तीच्या वर्तनाला दिशा देणारे असतील आणि विशिष्ठ कार्यासाठी विशिष्ठ प्रकारची मूल्य महत्वाची मानले जात असतील तर शिक्षकांच्या अंगी कोणकोणते मूल्य असणे आवश्यक आहे पाहणे अनिवार्य ठरते.कारण कुशल अध्यापनासाठी आवश्यक असलेली मूल्ये जर शिक्षकांच्या अंगी असतील तरच त्याचे अध्यापन परिणामकारक होउ शकेल व परिणामत शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल.शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिंग विकास साधावयाचा असतो यासाठी शिक्षकाला विषयाचे सखाल ज्ञान वर्गातील कार्यप्रवणता व व्यवसायाबाबतची निष्ठा असणे गरजेचे आहे.कारण शिक्षकाच्या व्यवसाय निष्ठेवरच शिक्षणाचा दर्जा अवलंबून असतो.परंतू शिक्षकाला व्यवसायिक म्हणून जी प्रतिष्ठा मिळायला पाहिजे ती मिळत नाही .प्रतिष्ठा मिळत नसल्यामुळे तो आपल्या व्यवसायात समाधानी राहू शकत नाही आणि म्हणून संशोधकाने शिक्षकांमध्ये असलेल्या व्यवसायिक मूल्यांचा शोध घेण्याच्या दृष्टीने या विषयाची मांडणी केली आहे.

**समस्येची गरजः-**

शिक्षक आपल्यामध्ये असलेल्या व्यवसायिक मूल्यामुळे स्वतः व विद्यार्थ्यांचा चांगल्या प्रकारे विकास साधु शकतो.आणि म्हणूनच शिक्षकाला राष्ट्रनिर्माता म्हणून संबोधले जाते.आज शिक्षकाला समाजात प्रतिष्ठा राहिलेली नाही हे खरे असले तरीही गेलेली प्रतिष्ठा परत मिळविण्यासाठी शिक्षकाने आत्मपरिक्षण केले पाहिजे. यातून शिक्षकाला

आपली बलस्थाने व कमतरता याची जाणिव होउन स्वतः ला सिध्द करणेसाठी शिक्षकामध्ये असलेल्या व्यवसायिक मूल्याचा विकास होणे अगत्यांचे आहे.

**समस्येचे महत्वः-**

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक विद्यार्थी व सामाजिक नैसर्गिक वातावरण या तीन घटकांनी शिक्षण प्रक्रिया पूर्ण होते.त्यामुळे शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील किती महत्वाचा घटक आहे हे आपल्या लक्षात येईल .पुरातन काळापासून शिक्षकाकडून आदर्श वर्तनाची अपेक्षा समाजाला आहे. एक सामान्य शिक्षक संपूर्ण अनिष्ठ अन्यायी राज्यव्यवस्था उलथून लावू शकतो.हे कौटिल्य सारख्या शिक्षकाने जगाला दाखवून दिले आहे.

शिक्षकी हा व्यवसाय असला तरी तो एक धर्म आहे.राष्ट्राचे भविष्य घडविण्याचे , राष्ट्राच्या भविष्याचे शिल्पकार निर्माण करण्याचे शिक्षण हे महत्वाचे साधन असून शिक्षक हा या प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहे.हे विसरता कामा नये. प्राचीन काळापासून शिक्षकी व्यवसायाला समाजात श्रेष्ठ स्थान आहे.त्याचे प्रमुख कारण म्हणजे या व्यवसायाची प्रतिष्ठा आहे.हि प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी शिक्षकांमध्ये व्यवसायिक मूल्य विकसित होणे क्रमप्राप्त आहे.

**समस्या विधानः-**

औरंगाबाद शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसायिक मूल्यांचा अभ्यास.

**संशोधनाची उद्दिष्टेः-**

- शिक्षकांमध्ये असलेल्या व्यवसायिक मूल्यांचा शोध घेणे.
- शिक्षकांना प्रेरित करणा-या व्यवसायिक मूल्याचा अभ्यास करणे.
- स्त्री-पुरूष शिक्षकातील व्यावसायिक मूल्यांतील फरक अभ्यासणे.

**गृहीतकेः-**

- व्यावसायिक मूल्य प्राप्त परिस्थितीवर अवलंबून असते.
- व्यावसायिक मूल्य लिंगभेदानुसार भिन्न असते.

**परिकल्पनाः-**

स्त्री व पुरूष शिक्षकांच्या व्यावसायिक मूल्यात लक्षणीय फरक आढळून येत नाही.

**संशोधन समस्येची व्याप्ती-**

**स्थळ व्याप्ती-**

औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात आला आहे.

**आशय व्याप्ती-**

प्रस्तुत संशोधन माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मूल्यांशी निगडीत आहे.

**नमुना व्याप्ती-**

औरंगाबाद शहरातील पाच शाळामधील ५० स्त्री-पुरूष शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VI Issue – IV November - December 2017

**निष्कर्ष व्याप्ती-**

औरंगाबाद शहरातील ५० शिक्षकांच्या व्यावसायिक मुल्यांशी संबंधित संशोधन आहे.

**संशोधन समस्येची मर्यादाः-**

**आशय मर्यादा-**

प्रस्तुत संशोधन औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकापुरते मर्यादित आहे.

**नमुना मर्यादा-**

प्रस्तुत संशोधनात औरंगाबाद शहरातील पाच शाळामधील ५० स्त्री-पुरूष शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे.

**निष्कर्ष मर्यादा-**

प्रस्तुत संशोधन औरंगाबाद शहरातील पाच शाळामधील ५० स्त्री-पुरूष शिक्षकापुरत मर्यादित आहे.

**संशोधन पध्दतीः-**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर आणि न्यादर्श सर्वेक्षणाचा उपयोग करण्यात आला आहे.

**नमुना निवड- (न्यादर्श)**

प्रस्तुत संशोधनात औरंगाबाद शहरातील मराठी माध्यमाचे माध्यमिक शिक्षक ही जनसंख्या आहे.

**नमुना-**

प्रस्तुत संशोधनात ५० माध्यमिक शिक्षकांची निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी स्तरीय नमुना निवड व प्रमाणित स्तरीय यादृच्छीक नमुना निवड पध्दतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाची साधनेः-**

प्रस्तुत संशोधनासाठी डॉ.सीमा संघई यांची Job Value Questionnair चाचणीचा उपयोग माहिती संकलनासाठी केला असून चाचणीत एकूण ५३ विधाने दिलेले आहेत.ही पंचबिंदू श्रेणी असून यात व्यावसायिक मूल्यासंदर्भात ११ घटक दिलेले आहेत.

- आर्थिक फायदा
- आर्थिक फायदा नसलेला
- विकास आणि पदोन्नतीची संधी
- जबाबदारी आणि स्वतंत्र कृती करण्याची संधी
- व्यवसाय आणि वैयक्तिक सुरक्षा
- कार्याचे प्रकार
- व्यवसाय रूची आणि क्षमता

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VI Issue – IV November - December 2017

- पर्यवेक्षण-पर्यवेक्षण आणि व्यवस्थापन
- सहकारी आणि उपसहाय्यक
- व्यवसायिक गुणसंपन्नता , मान्यता आणि मोल
- कार्याची स्थिती

**सामग्री विश्लेषण व अन्वयार्थः-**

प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषन व अर्थनिर्वचन केले असून ते व्यावसायिक मुल्यांशी संबंधित ११ घटकावर अधारित आहे.या प्रत्येक घटकाचे वर्गांतर काढून वारंवारिता काढण्यात आली त्याचे मध्यमान ,प्रमाण विचलन व क्रांतीक गुणोत्तर काढून प्राप्त गुणोत्तरावर परिकल्पनांची ०.०५ (१.९६)या सार्थकता स्तरावर पडताळा घेण्यात आला.

**तालिका क्र.०१**

**आर्थिक फायदा**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १६.१८ | ४.५८ | ३.४० |
| ०२ | पुरूष | २५ | १३.०६ | ४.५४ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ३.४० हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री - पुरूष शिक्षकांमध्ये आर्थिक फायदा या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.०२**

**आर्थिक फायदा नसलेला**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १०.५२ | २.७७ | १.३५ |
| ०२ | पुरूष | २५ | ९.५५ | ४.०२ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर १.३५ हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना स्वीकारणीय ठरते.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VI Issue – IV November - December 2017

**निष्कर्ष-**

स्त्री -पुरूष शिक्षकांमध्ये आर्थिक फायदा नसलेला मूल्यांमध्ये लक्षणीय फरक नाही.

**तालिका क्र.०३**

**विकास आणि पदोन्नतीची संधी**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १६.२४ | ३.५२ | ३.८५ |
| ०२ | पुरूष | २५ | १३.३२ | ३.६३ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ३.८५ हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना स्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष –**

स्त्री -पुरूष शिक्षकांमध्ये विकास आणि पदोन्नतीची संधी या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.०४**

**जबाबदारी आणि स्वतंत्र कृती करण्याची संधी**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १६.७४ | ३.८१ | ३.२२ |
| ०२ | पुरूष | २५ | १३.७४ | ५.३७ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ३.२२ हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री –पुरूष शिक्षकांमध्ये जबाबदारी आणि स्वतंत्र कृती करण्याची संधी या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.०५**

**व्यवसाय आणि वैयक्तिक सुरक्षा**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | २४.०० | ५.५० | ५.६० |
| ०२ | पुरूष | २५ | १८.५ | ४.४८ | |

International Innovative Journal Impact Factor (IIJIF) Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VI Issue – IV November - December 2017

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ५.६० हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री-–पुरूष शिक्षकांमध्ये व्यवसाय आणि वैयक्तिक सुरक्षा या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.०६**

**कार्याचे प्रकार**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १८.८० | ३.०० | ४.४८ |
| ०२ | पुरूष | २५ | १५.७० | ३.५३ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर४.४८ हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री -पुरूष शिक्षकांमध्ये कार्याचे प्रकार या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.०७**

**व्यवसाय रूची आणि क्षमता**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १८.७४ | ३.०५ | ३.९० |
| ०२ | पुरूष | २५ | १५.८ | ४.५४ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ३.९० हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री –पुरूष शिक्षकांमध्ये व्यवसाय रूची आणि क्षमता या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VI Issue – IV November - December 2017

**तालिका क्र.०८**

**पर्यवेक्षण-पर्यवेक्षण आणि व्यवस्थापन**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १४.२० | २.८० | ३.०२ |
| ०२ | पुरूष | २५ | १२.२५ | २.८१ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ३.०२ हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री –पुरूष शिक्षकांमध्ये पर्यवेक्षण-पर्यवेक्षण आणि व्यवस्थापन या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.०९**

**सहकारी आणि उपसहाय्यक**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १५.१२ | २.६६ | ३.९९ |
| ०२ | पुरूष | २५ | १२.८ | २.७७ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ३.९९ हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री -पुरूष शिक्षकांमध्ये सहकारी आणि उपसहाय्यक या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.१०**

**व्यवसायिक गुणसंपन्नता , मान्यता आणि मोल**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १८.७४ | २.७० | ६.६० |
| ०२ | पुरूष | २५ | १४.९८ | ३.०० | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोत्तर ६.६० हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VI Issue – IV November - December 2017

**निष्कर्ष-**

स्त्री-पुरूष शिक्षकांमध्ये व्यवसायिक गुणसंपन्नता , मान्यता आणि मोल या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**तालिका क्र.११**

**कार्याची स्थिती**

| अ.क्र. | लिंग | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | क्रांतीक गुणोत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्त्री | २५ | १३.७४ | २.२० | ४.०१ |
| ०२ | पुरूष | २५ | ११.७० | २.७५ | |

**अर्थनिर्वचन-**

प्राप्त क्रांतिक गुणोततर ४.०१ हे ०.०५ सार्थकता स्तरावर १.९६ पेक्षा अधिक असल्याने ०.०५ स्तरावर आणि म्हणून सदर परिकल्पना अस्विकारणीय ठरते.

**निष्कर्ष-**

स्त्री - पुरूष शिक्षकांमध्ये कार्याची स्थिती या व्यवसायिक मूल्यामध्ये फरक आहे.

**परिकल्पना पडताळा-**

सदर परिकल्पनेसाठी संशोधनकर्त्याने अकरा घटकाच्या साहयाने मूल्य समुहाची तपासणी केली .त्यातून संशोधकाला माध्यमिक शाळेतील स्त्री- पुरूष शिक्षकांच्या व्यावसायिक मूल्य समुहात फरक आहे.

सदर परिकल्पनेच्या तपासणीसाठी क्रांतीक गुणोत्तर परिक्षिका या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला.०.०५ या स्तरावर सदर परिकल्पना सार्थक ठरत असल्यामुळे अस्वीकारणीय ठरते म्हणून सदर परिकल्पनेचा त्याग करण्यात येत आहे.

**निष्कर्ष-**

१. शिक्षकामध्ये व्यावसायिक मूल्य समान आहेत.
२. लिंगभेदानुसार शिक्षकामध्ये व्यावसायिक मूल्य समान आहेत.
३. आर्थिक फायदा नसलेला या मूल्य समुहाबाबत स्त्री –पुरूष शिक्षकामध्ये फरक आहे.

**शिफारसी-**

१. शिक्षकांना सर्व प्रकारचे आर्थिक लाभ देण्यात यावेत.
२. शिक्षकांनी आपल्या सहकाऱ्यांच्या बाबतीत सकारात्म दृष्टीकोन ठेवावा.
३. शिक्षकांना विविध प्रकारचे समृध्द अनुभव देण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखवेत.
४. शिक्षकांना स्वतंत्र्यरीत्या कार्य करण्याची संधी देण्यात यावी.
५. शिक्षकांना नियमानुसार पदोन्नतीची संधी देण्यात यावी.
६. शिक्षकांना आपला व्यवसाय वृध्दीसाठी विविध उदबोधन वर्गाला उपस्थित राहण्याची संधी द्यावी.
७. शिक्षकांना जास्तीत जास्त सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**संदर्भग्रंथ सुची**

१. गांवडे एकनाथ मुल्यधिष्ठित शिक्षण, नित्य नुतन प्रकाशन पुणे.

२. भिंताडे वि.रा.(२००६) शैक्षणिक संशोधन पध्दती ,नित्य नुतन प्रकाशन पुणे.

३. कदम चा.पा.(१९८९) शैक्षणिक संख्याशास्त्र ,नुतन प्रकाशन पुणे.

४. कुडंले म.बा.(१९९६) शैक्षणिक तंत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन पुणे.

५. कुलकर्णी के.व्ही. (१९९६) शैक्षणिक मानसशास्त्र ,श्रीविद्या प्रकाशन पुणे.

६. भांडारकर के.एम.(१९८८) शैक्षणिक संख्याशास्त्र नुतन प्रकाशन पुणे.

७. www.businessdictionary.com

८. www.maharashtratimes.indiatime.com